


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ७८ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार । ३१/०३/२०२६ । पान - ६




# संगमनेरला अवकाळीचा तडाखा; घरांचे पत्रे उडाले, शेती पिकांचे मोठे नुकसान






संगमनेर तालुक्यातील निमज, धांदरफळ , जवळेकडलग या परिसरात मोठ्या प्रमाणावर वादळी वाऱ्यांसह गारांचा पाऊस पडला. यात घरांचे, शेतीचे मोठे नुकसान झाले. शेवटच्या छायाचित्रात नकसानीची पहाणी करतांना माजी मंत्री बाळासाहेब थोरात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - कडक उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर संगमनेर तालुक्यात रविवारी (दि. २९) सायंकाळी अचानक वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. या अनपेक्षित पावसामुळे शहरासह ग्रामीण भागात मोठे नुकसान झाले असून नागरिकांची एकच धावपळ उडाली.

गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या उष्णतेनंतर रविवारी दुपारपासूनच वातावरणात बदल जाणवत होता. ढग दाटून आल्याने सायंकाळी सुमारे पाच वाजेच्या सुमारास वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. या वादळामुळे धांदरफळ बुद्रुक, जवळे कडलग आदी परिसरात अनेक घरांचे पत्रे उडून मोठे नुकसान झाले.

धांदरफळ बुद्रुक येथील भास्कर आल्हाट यांच्या घरावरील पत्रे उडून मोठे नुकसान झाले. विशेष म्हणजे, त्या वेळी घरात सहा महिन्यांचे व एक वर्षाचे बालक झोपेत होते. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. तसेच रामेश्वर देवस्थानाचेही पत्रे उडून नुकसान झाले आहे.

दरम्यान, सध्या गहू, हरभरा, द्राक्षे, डाळिंब यांसारख्या पिकांची काढणी सुरू असताना अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. काढणीला आलेल्या पिकांना फटका बसल्याने शेतकरी हवालदिल झाले असून हाता-तोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

हवामान खात्याने पुढील काही दिवसांतही अवकाळी पावसासह गारपिटीची शक्यता वर्तवली आहे. त्यानुसार दि. ३० व ३१ मार्चदरम्यान 'ऑरेंज अलर्ट' तर दि. १ व २ एप्रिलदरम्यान 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. वीजांचा कडकडाट, सोसाट्याचा वारा व गारपीट होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी नागरिकांना काळजी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. वादळी वाऱ्यावेळी झाडाखाली उभे राहू नये, विद्युत उपकरणांचा वापर टाळावा, तसेच मोकळ्या मैदानात, टॉवर्स, विद्युत खांब, ट्रान्सफॉर्मर किंवा धातूच्या वस्तूंपासून दूर राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. धरण, नदी किंवा कालव्यात उतरणे टाळावे तसेच धोकादायक ठिकाणी सेल्फी घेऊ नये, असेही सांगण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी शेतीमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा, बाजार समितीत आणलेला माल सुरक्षित ठेवण्याची काळजी घ्यावी व जनावरांना सुरक्षित ठिकाणी हलवावे, (पान ५ वर)

## शेतकऱ्यांवर अस्मानी आणि सुलतानी संकटांचा दुहेरी घाव

सध्या राज्यातील शेतकरी अक्षरशः संकटांच्या चक्रव्यूहात अडकला आहे. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, तर कधी अवकाळी पावसाचा कहर-अशा अस्मानी संकटांनी शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. विशेष म्हणजे, पूर्वी आठ-दहा वर्षांतून एकदा पडणारा अवकाळी पाऊस आता दरवर्षीच नव्हे तर वारंवार कोसळताना दिसत आहे. यामुळे शेतीचे गणित पूर्णपणे बिघडले आहे.

सरकार एका अवकाळीचा पंचनामा करून मदतीची घोषणा करेपर्यंत दुसरा अवकाळी हजेरी लावतो, ही वस्तुस्थिती शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत आहे. मदतीच्या घोषणा होतात, पण त्या प्रत्यक्षात कधी आणि किती मिळणार, याची अनिश्चितता कायम आहे. आधीच वाढती महागाई, कर्जाचा वाढता बोजा आणि शेतमालाला मिळत नसलेला योग्य भाव यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे खचला आहे. उत्पादन खर्च वाढत असताना उत्पन्न मात्र घटत चालले आहे. या पार्श्वभूमीवर अवकाळी पावसाने हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतल्याने बळीराजा अक्षरशः हतबल झाला आहे. शेतकऱ्यांच्या या भीषण परिस्थितीकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देत तात्काळ आणि ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. अन्यथा, अन्नदाता म्हणून ओळखला जाणारा शेतकरीच जगण्यासाठी संघर्ष करत राहील, ही दुर्दैवी परिस्थिती अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# संगमनेर पालिकेचा 'कागदी' कारभार

## मोकाट कुत्र्यांचा हौदोस, नागरिक दहशतीखाली!




युवावार्ता (प्रसाद सुतार)

संगमनेर - संगमनेर शहरात सध्या मोकाट कुत्र्यांनी अक्षरशः सुळसुळाट केला असून, प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या जिवाचा थरकाप उडत आहे. पहाटे फिरायला जाणाऱ्यांपासून ते रात्री उशिरा घरी परतणाऱ्यांपर्यंत सर्वांनाच या कुत्र्यांनी लक्ष केले असून, अनेक ठिकाणी कुत्र्यांनी नागरिकांचे लचके तोडल्याच्या घटना घडल्या आहेत. मात्र एवढे होऊनही संगमनेर नगरपालिकेला अद्याप जाग आलेली नाही, की त्यांना रक्ताळलेले नागरिक दिसत नाहीत? असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे. मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या संख्येबाबत वारंवार तक्रारी करूनही नगरपालिका प्रशासन केवळ 'आश्वासनांची गाजरे' दाखवत आहे. पालिकेच्या दप्तरी श्वान निर्बीजीकरण आणि इतर उपाययोजनांच्या फाईल्स तयार आहेत मात्र प्रत्यक्षात रस्त्यावर परिस्थिती 'जैसे थे' आहे. पालिकेच्या या कागदी घोड्यांमुळे सामान्य जनतेचे आरोग्य आणि सुरक्षितता वाऱ्यावर सोडून दिली गेली आहे. प्रशासनाचे नियोजन केवळ कागदावरच असून प्रत्यक्षात त्या उपाययोजना हवेत विरून गेल्याचे चित्र दिसत आहे. जेव्हा जेव्हा कुत्र्यांचा प्रश्न ऐरणीवर येतो, तेव्हा नगरपालिका प्रशासन सोयीस्करपणे 'श्वानप्रेमीं'वर खापर फोडून मोकळे होते. जर श्वानप्रेमींमुळे कारवाईत अडथळा येत असेल, तर मग ही कुत्री सांभाळण्याची जबाबदारी पालिकेने अधिकृतपणे त्यांच्यावरच का सोपवू नये? असा रोकडा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. जबाबदारी झटकण्यात धन्यता मानणाऱ्या पालिकेला एखाद्या मोठ्या दुर्घटनेची प्रतीक्षा आहे का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.शहरातील मुख्य चौक, गल्लीबोळ आणि उपनगरांमध्ये कुत्र्यांच्या टोळ्यांनी साम्राज्य निर्माण केले आहे. लहान मुले आणि वृद्धांचे घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. पालिकेच्या या 'ढिम्म' कारभारामुळे जनतेमध्ये तीव्र संताप असून, आता काय कुणाचा बळी गेल्यावरच पालिका प्रशासन कुत्रे पकडणार का? अशी संतप्त विचारणा संगमनेरकर करत आहेत. विषेश म्हणजे

शहरात गेल्या काही दिवसांपासून भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट वाढला असून, प्रशासनाकडून हे कुत्रे पकडून शहराबाहेर किंवा लगतच्या ग्रामीण भागात सोडले जात आहेत. मात्र, यामुळे आता शहर आणि ग्रामीण भागातील संघर्षाचा नवा पैलू समोर आला असून, कुत्र्यांच्या बदलत्या वर्तणुकीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.नगरपालिकेकडून पकडण्यात आलेले कुत्रे शहराच्या हद्दीबाहेर सोडले जातात. मात्र, ज्या ग्रामीण भागात हे कुत्रे सोडले जातात, तेथील रहिवासी आणि शेतकरी याला तीव्र विरोध करत आहेत. शहरातील समस्या आमच्या उरावर का? असा सवाल विचारत, संतप्त ग्रामस्थ हे कुत्रे पुन्हा वाहनांमध्ये भरून रात्रीच्या वेळी शहरात आणून सोडत असल्याचे प्रकार समोर येत आहेत. या 'येरे माझ्या मागल्या' प्रकारामुळे कुत्र्यांची संख्या कमी होण्याऐवजी ती ठराविक भागात एकवटत आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, शहराबाहेर माळरानावर किंवा जंगल क्षेत्राच्या जवळ सोडल्या जाणाऱ्या मादी कुत्र्यांचा संपर्क लांडगे किंवा कोल्ह्यांसारख्या हिंस्त्र वन्यप्राण्यांशी येत आहे. स्थानिक जाणकारांच्या मते, (पान ३ वर)

# इराणी तेलावर ताबा मिळविण्यातच आनंद - ट्रम्प




नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष आणि सध्याच्या जागतिक घडामोडींमधील कळीचे नेते डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणबाबत एक खळबळजनक वक्तव्य केले आहे. 'फायनान्शिअल टाइम्स'ला दिलेल्या मुलाखतीत ट्रम्प यांनी स्पष्ट केले की, त्यांना इराणचे तेल मिळवायचे आहे आणि गरज पडल्यास अमेरिका इराणचे प्रमुख तेल निर्यात केंद्र असलेल्या 'खार्ग बेटावर' ताबा मिळवू शकते. या विधानामुळे मध्य-पूर्वेतील तणाव आणखी वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ट्रम्प यांनी मुलाखतीत म्हटले, ख़रं सांगायचं तर, माझी सर्वात आवडती गोष्ट म्हणजे इराणचे तेल मिळवणे. ख़ार्ग बेट हे इराणच्या तेल निर्यातीचे मुख्य केंद्र मानले जाते. या बेटावर ताबा मिळवण्याचे संकेत देऊन ट्रम्प यांनी इराणच्या अर्थव्यवस्थेची नाडी आवळण्याची तयारी दर्शवली आहे. तिथून १००० पाउंड यूरेनियम बाहेर काढण्यासाठी मोठ्या लष्करी मोहिमेचा विचार करत असल्याचा खळबळजनक खुलासा केला आहे. यामध्ये अमेरिकन सैन्याला अनेक दिवस इराणच्या भूमीवर राहावे लागू शकते. पाकिस्तानामार्फत पडद्यामागून हालचालीविशेष म्हणजे, यावेळी ट्रम्प यांनी इराणसोबत सुरू असलेल्या गुप्त वाटाघाटींचाही खुलासा केला. अमेरिका आणि इराणमध्ये थेट आणि अप्रत्यक्ष चर्चा सुरू असून यामध्ये पाकिस्तानचे 'दूत' मध्यस्थी करत असल्याचे ट्रम्प यांनी सांगितले. ही चर्चा सकारात्मक दिशेने जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. होर्मुझची सामुद्रधुनी आणि २० टँकर्सचा करार इराण आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या एका नव्या करारानुसार, पाकिस्तानचा ध्वज असलेले २० मोठे तेल टँकर्स 'होर्मुझच्या सामुद्रधुनीतून' जाण्यास इराणने संमती दिली आहे. इराणच्या संसदेचे सभापती मोहम्मद बाकेर घालिबाफ यांनी या व्यवस्थेला मंजुरी दिली असून, सोमवारपासून हे टँकर्स तेल घेऊन रवाना होतील, असे ट्रम्प यांनी सांगितले. या घडामोडींमुळे जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमती आणि पुरवठ्यावर मोठा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.







# संगमनेरात राज्यस्तरीय दूध उत्पादन परिषद




युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर - सोमवार दिनांक ३० मार्च २०२६ रोजी येथील वसंत लॉन्स येथे पंजाब मिल्क फार्मर असोसिएशनच्या धरतीवर राजहंस दूध संघाच्या मिशन ५० लिटर उत्पादन अंतर्गत संगमनेर तालुक्यातील १५०० तरुण दूध उत्पादक व त्यांच्या पत्नी यांच्या उपस्थितीमध्ये राज्यस्तरीय दुग्ध उत्पादन परिषद पार पडली. यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ बाळासाहेब थोरात, पंजाब राज्यातील विविध अधिकारी व पदाधिकारी, मा.आ. डॉ. सुधीर तांबे, राजहंस दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते यशस्वी दूध उत्पादकांचा सत्कार करण्यात आला.

# पथविक्रेता समितीला डावलून संगमनेर नगरपालिकेची हटाव मोहीम; आंदोलनाचा इशारा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर नगरपालिकेकडून गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पथविक्रेते हटाव मोहिमेविरोधात संताप व्यक्त होत असून, पथविक्रेता समितीला विचारात न घेता ही कारवाई केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या नवीन धोरणानुसार पथविक्रेत्यांच्या कल्याणासाठी कायदे तयार करण्यात आले असून, त्यांच्या अंमलबजावणीसाठी अधिकृत पथविक्रेता समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. या समित्यांची निवडणूक होऊन शासनाच्या गॅझेटमध्ये त्यांची घोषणा देखील करण्यात आली आहे. असे असताना नगरपालिकेकडून समितीला डावलून थेट हटाव मोहीम राबविणे हे शासनाच्या धोरणाविरोधात असल्याचा आरोप पथविक्रेता प्रतिनिधींनी केला आहे.

पथविक्रेते, टपरीधारक आदींकडून नगरपालिकेला ठेक्याद्वारे दरवर्षी सुमारे ७८ लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. प्रत्येक पथविक्रेत्याकडून दरमहा किमान ९०० रुपये आकारले जात असतानाही त्यांना कोणत्याही मूलभूत सुविधा दिल्या जात नसल्याची नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

दरम्यान, सुमारे महिनाभरापूर्वी नगरपालिकेसोबत झालेल्या बैठकीत शहरातील वाहतूक समस्या सोडविण्यासाठी सर्वांवर समान कारवाई करण्याचे ठरले होते. रस्त्यालगत करण्यात आलेली बेकायदेशीर गाळे बांधकामे, पार्किंगची कमतरता तसेच नागरिकांनी केलेली नियमबाह्य बांधकामे यावर सर्वेक्षण करून कारवाई करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात केवळ पथविक्रेत्यांनाच लक्ष्य केले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याबाबत पथविक्रेता समितीचे सदस्य ॲड. संग्राम माधवराव जोंधळे यांनी इशारा देताना सांगितले की, नगरपालिकेने ही अन्यायकारक मोहीम तात्काळ थांबवावी, अन्यथा संगमनेर शहरात पथविक्रेत्यांच्या वतीने मोठ्या प्रमाणात आंदोलन छेडण्यात येईल.

या इशाऱ्याला संघर्ष टपरीधारक संघटनेचे संस्थापक तसेच पथविक्रेत्यांच्या शासकीय समितीचे सदस्य ॲड. संग्राम जोंधळे यांच्यासह केशवराव जाधव, भारत पडवळ, अब्दुल्लाह हसन चौधरी, शिवपाल सिंह ठाकूर, नागेश रघुवंशी, दत्ता कांडेकर, अक्षय येवले, संदीप मेहेर आणि नर्गिस आत्तार यांनी पाठिंबा दर्शविला आहे.

# दुष्काळी गावांसाठी राजहंस दूध संघाचा पुढाकार



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुका हा विस्ताराने मोठा असून पठार भाग, प्रवरा पट्टा व तळेगाव पट्टा असे भौगोलिक तीन विभाग आहेत. पर्जन्य छायामुळे तालुक्यात कमी पाऊस होत असून उन्हाळ्यामध्ये काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्रता जाणवत आहेत. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी कायम अडचणीमध्ये जनतेला मदत केली असून दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना पिण्याच्या पाण्याची मदत व्हावी याकरता राजहंस दूध संघाकडून पिण्याच्या पाण्याचे टँकर पुरवले जात असून नागरिकांना मदत होत आहे.

संगमनेर तालुक्यासह उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यातील १८२ दुष्काळी गावांमधील जनतेसाठी शेती व पिण्याच्या पाण्याची शाश्वत सुविधा व्हावी याकरता माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी अनंत अडचणींवर मात करून निळवंडे धरण व डावा आणि उजवा कालवा पूर्ण केला. निळवंडे धरणात आलेल्या पाण्यामुळे या दोन्ही कालव्यांमधून पाणी मिळत असल्याने अनेक गावांमध्ये पाण्याचा प्रश्न मिटला आहे. निळवंडेचे पाणी लाभ क्षेत्रातील सर्व नागरिकांना मिळालेच पाहिजे यासाठी निळवंडे धरणाचे निर्माते बाळासाहेब थोरात यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू असून कॅनॉलच्या वरील बाजूच्या शेतकऱ्यांना पाणी मिळावे यासाठी त्यांनी पायाभूत आखणी करून ठेवली आहे. ती फक्त मार्गी लावण्याचे काम नव्या सरकारला करायचे आहे.

या शाश्वत सुविधेबरोबर उन्हाळ्यामध्ये काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाल्यास सहकारातील विविध संस्थांनी वेळोवेळी अत्यंत मोलाचे योगदान दिले आहे. त्याचबरोबर लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी कायम टंचाई पूर्वीच काळजी घेत तालुक्यातील जनतेला दिलासा दिला आहे. गेल्या काही दिवसापासून तालुक्यात उन्हाची तीव्रता वाढली असून पठार भागातील काही गावे व वाड्या वास्त्यांवर पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू लागली आहे. शासनाची मदतीची वाट न पाहता जनतेच्या मागणीवरून बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली राजहंस दूध संघाच्या वतीने पिण्याच्या पाण्याचे चार टँकर पुरवले जात आहे.

येताना पाणी घेऊन यायचे आणि जाताना दूध घेऊन जायचे असा दिनक्रम या टँकरचा बनला असून दूध व्यवसायामुळे तालुक्यात समृद्धी निर्माण झाली आहे. त्या शेतकऱ्यांना व नागरिकांना पिण्याच्या पाणी ची सुविधा देण्याकरता राजहंस दूध संघाने कायम पुढाकार घेतला आहे.

**संगमनेर तालुका हा विस्ताराने मोठा असून १७१ गावे व २५८ वाड्या वस्त्या आहेत. प्रत्येक गावातील नागरिकांना अडचणी येऊ नये यासाठी लोकनेते बाळासाहेब थोरात हे कायम तालुक्यातील जनतेच्या अडचणींवर लक्ष ठेवून असून सातत्याने जनतेला मदत करत आहेत. उन्हाळ्यात नागरिकांना अडचण येऊ नये याकरता सहकारासह राजहंस दूध संघाने शासनाच्या मदतीची वाट न पाहता मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पिण्याच्या पाण्याचे टँकर उपलब्ध करून दिले जात असल्याचे दूध संघाचे चेअरमन रणजीतसिंह देशमुख यांनी म्हटले आहे.**

# नुकसानग्रस्त भागातील शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे करा- आ. खताळ

## धांदरफळ, डेरेवाडी, निमज गावातील नुकसानग्रस्त भागाची केली पाहणी





### कर्तव्यदक्ष आमदारांची दखल घरकुलासाठी तात्काळ आदेश

**धांदरफळ बुद्रुक येथील भास्कर आल्हाट यांनी घरकुल योजनेसाठी वारंवार अर्ज करूनही लाभ मिळाला नसल्याची तक्रार आमदार खताळ यांच्यासमोर मांडली. यावर आमदार खताळ यांनी ग्रामपंचायत अधिकारी सुरेश मंडलिक यांना जाब विचारत आल्हाट यांचे नाव तात्काळ घरकुल योजनेच्या यादीत समाविष्ट करा, असे सक्त निर्देश आमदार खताळ यांनी ग्रामपंचायत अधिकारी मंडलिक यांना दिले.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर तालुक्यात झालेल्या अवकाळी पावसासह वादळी वाऱ्याने आणि गारपिटीने मोठे नुकसान झालेल्या भागाची आमदार अमोल खताळ यांनी सोमवारी सकाळी सकाळी पाहणी करून महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना सरसकट पंचनामे करण्याचे तात्काळ आदेश महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

संगमनेर तालुक्यातील धांदरफळ बुद्रुक, धांदरफळ खुर्द, डेरेवाडी, गोडसेवाडी, निमज व राजापूर या गावांना या नैसर्गिक आपत्तीचा मोठा फटका बसला आहे. गहू, कांदा, टोमॅटो मका तसेच डाळिंब पिकांचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले असून अनेक शेतांतील उभी पिके आडवी पडली आहेत. गारपिटीमुळे डाळिंब बागांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. धांदरफळ बुद्रुक गावांतर्गत डेरेवाडी येथे संजय शिवाजी साबळे यांच्या घरावरील पत्रे वादळी वाऱ्याने उडून गेले. या घटनेत आदिती संजय साबळे ही जखमी झाली असून तिच्यावर लोणी येथील प्रवरा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. साठेनगर येथील भास्कर आल्हाट यांच्या घरावरील पत्रे उडून गेले. त्याचवेळी घरात झोळीमध्ये झोपलेल्या लहान मुलीला तिच्या आईने प्रसंगावधान राखत सुखरूप बाहेर काढले. तसेच वर्षा भिमराज गोर्डे यांचे घर कोसळले असून त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. धांदरफळ खुर्द येथील सिंधुबाई देवगिरे यांच्या डाळिंब बागेचे, भास्कर कोकणे यांच्या टोमॅटो पिकाचे नुकसान झाले आहे. निमज येथील कृषीभूषण पुरस्कार विजेते तुकाराम गुंजाळ यांच्या डाळिंब बागेसह श्यामराव किसन कासार यांच्या गव्हाच्या पिकाचे नुकसान झाले आहे. तसेच निमज येथील महानुभव पंथाच्या आश्रमावरील पत्रे उडून गेली आहेत. आ. अमोल खताळ यांनी महसूल व कृषी अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष शेतात जाऊन परिस्थितीची पाहणी केली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत मिळण्यासाठी पंचनामे विलंब न करता पूर्ण करावेत, असे स्पष्ट निर्देश दिले.

या पाहणी दौऱ्यात उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, तालुका कृषी अधिकारी रेजा बोडके, निवासी नायब तहसीलदार सुभाष कदम, ग्रामपंचायत अधिकारी सुरेश मंडलिक धांदरफळ खुर्द ग्रामपंचायत अधिकारी राजेश गुंजाळ यांच्यासह महसूल व कृषी विभागाचे अधिकारी व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# हिवरगाव पावसा ग्रामपंचायतने महावितरणला दिला शॉक

## थकित कराची रक्कम वसुलीसाठी सब स्टेशन कार्यालयास ठोकले टाळे



**हिवरगाव पावसा ग्रामपंचायत नागरिकांसाठी विविध सुविधा निर्माण करण्यासाठी नेहमीच पुढाकार घेत असते नागरिकांचे गैरसोय होऊ नये याकरिता विविध उपाय योजना राबविण्यात येतात. मात्र यासाठी ग्रामपंचायत कराची रक्कम वसूल होणे अत्यंत आवश्यक आहे. महावितरण कार्यालया प्रमाणे टोल प्राधिकरण यांची लाखो रुपयांची मोठ्या प्रमाणात थकित असलेली कराची रक्कम वसूल करण्यासाठी शासकीय पातळीवर तात्काळ उपायोजना न झाल्यास हिवरगाव पावसा टोल प्लाझा सील करण्याचे कारवाई करावी लागेल असे ग्रामपंचायत हिवरगांव पावसा प्रशासनाकडून नमूद करण्यात आले. गणेश दवंगे, संगमनेर भाजपा सरचिटणीस**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - हिवरगाव पावसा ग्रामपंचायतीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे (महावितरण) असलेल्या ७२ हजार रुपयांच्या थकबाकी वसुलीसाठी कंपनीच्या ११ के.व्ही.उपकेंद्र कार्यालयास टाळे ठोकले. याबाबत हिवरगाव पावसा ग्रामपंचायतीच्यावतीने महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीकडे असलेल्या सुमारे ७२ हजार रुपयांची कराची थकबाकी भरण्याबाबत वारंवार नोटीस देण्यात आली होती. दोन वेळेस लोक अदालत चे नोटीस बजावण्यात आली होती परंतु, याबाबत विद्युत कंपनीकडून कोणतीही कार्यवाही झाली नसल्यामुळे गटविकास अधिकारी पंचायत समिती संगमनेर यांच्या आदेशानुसार ग्रामपंचायत प्रशासनाकडून थेट वसुलीची मोहीम हाती घेत कठोर भूमिका घेतली. अखेर हिवरगाव पावसा ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी राजेंद्र कासार व ग्रामपंचायत अधिकारी हरीश गडाख यांनी हिवरगाव पावसा उपकेंद्र कार्यालयास टाळे ठोकले.

यावेळी ग्रामपंचायतीचे सरपंच सुभाष गडाख, उपसरपंच सुजाता दवंगे, काशिनाथ पावसे, गणेश दवंगे,किरण पावसे, बाळासाहेब भालेराव,प्रवीण गडाख यांच्या सह ग्रामस्थ उपस्थित होते. वेळेवर लाईट बिल भरण्याची अपेक्षा ठेवणाऱ्या वीज मंडळाकडूनच ग्रामपंचायतीचा कर प्रलंबित राहिल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.पंचायत समितीच्या कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांच्या आदेशानुसार सदर मोहीम राबविण्यात आली.हिवरगाव पावसा उपकेंद्रास मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. महावितरण कडून ग्रामपंचायत कराची मोठी रक्कम थकित असल्याबद्दल ग्रामस्थांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

याबाबत सरपंच सुभाष गडाख व ग्रामपंचायत अधिकारी हरिष गडाख म्हणाले की,"महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीकडे कराची थकबाकी असून कर भरण्याबाबत विद्युत कंपनीला वारंवार सूचना देण्यात आल्या होत्या. संबंधित अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले त्यामुळे सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करून गटविकास अधिकारी पंचायत समिती संगमनेर यांच्या आदेशानुसार सदर कार्यालयास टाळे लावावे लागले . महावितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता शेख यांनी मंगळवार दिनांक ३१ मार्च अखेर ग्रामपंचायत कराचा भरणा करून देण्याचे आश्वासन देण्यात आले. याशिवाय चंदनापुरी हिवरगाव पावसा व झोळे या तीन गावची आदर्श ग्राम पाणीपुरवठा योजनेची महावितरणने वीजपुरवठा केल्यामुळे दोन दिवसापासून बंद होता.वीजपुरवठा सुरळीतपणे चालू करून देण्यात आला. सहाय्यक अभियंता शेख व वीज वितरण कंपनीने सहकार्य केल्याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

# विधान परिषदेत सत्यजित तांबे यांची अभ्यासपूर्ण मांडणी

## उत्तर महाराष्ट्राच्या प्रश्नांवर तांबे यांचा पाठपुरावा



**सोशल मीडियावर आ. सत्यजीत तांबे यांच्या भाषणाची धूम**

**तरुणाई मध्ये आमदार सत्यजित तांबे यांच्या भाषणाची मोठी क्रेझ असून त्यांनी विधान परिषदेमध्ये केलेल्या विविध भाषणांच्या व्हिडिओ सोशल मीडियाच्या अनेक प्लॅटफॉर्मवर असून त्याला तरुणांमधून मोठी पसंती मिळत आहे.**

युवावार्ता ( प्रतिनिधी )

संगमनेर- नव्या पिढीतील अभ्यासू आमदार म्हणून ओळख बनलेले आमदार सत्यजित तांबे यांनी मुंबई येथे झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात युवकांची बेरोजगारी, महिला सुरक्षा, नाशिक - पुणे रेल्वे, नवीन एमआयडीसी, वीजदर, शेतकऱ्यांचे प्रश्न, शिक्षण क्षेत्रातील प्रश्न, याचबरोबर उत्तर महाराष्ट्राच्या विविध प्रश्नांची अभ्यासपूर्ण मांडणी केली असून त्यांनी अधिवेशनात मांडलेल्या विविध विषयांची राज्यभर चर्चा झाली आहे. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या तत्व विचारांवर आणि लोकनेते माजीमंत्री बाळासाहेब थोरात व मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार सत्यजित तांबे यांनी राज्यभर युवकांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी मोठे काम केले आहे. विविध भाषांवरील प्रभुत्व, अभ्यासपूर्ण मांडणी, प्रश्नांचे आकलन आणि प्रश्न सोडवण्यासाठीचा पाठपुरावा याबाबत राज्यातील निवडक आमदारांमध्ये त्यांचा समावेश होत आहे.

मुंबई येथे झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात १९ दिवसाच्या कामकाजा पैकी आमदार सत्यजित तांबे हे १७ दिवस उपस्थित राहिले. याचबरोबर १५२ तारांकित प्रश्न त्यांनी मांडले. तर ३५ लक्षवेधी सूचना केल्या. ६ सर्वसाधारण अर्धा तास चर्चा केल्या. तर ६ शासकीय ठराव मांडले. १८ औचित्याचे मुद्दे व १८ विशेष उल्लेख त्यांनी केले. याचबरोबर ६ अल्पकालीन चर्चा, १५ नियम ९३ अन्वये सूचना आणि १४ पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन त्यांनी मांडल्या. अर्थसंकल्पीय चर्चेत सहभाग, लक्षवेधी सूचनेवरील चर्चेत सहभाग, तारांकित प्रश्न व सत्तारूढ गट आणि विरोधी पक्षांच्या प्रस्तावावरील चर्चेत सहभाग विविध विधेयकांवरील चर्चेत त्यांचा सहभाग हा लक्षवेधी ठरला.

याचबरोबर या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये नाशिक - पुणे संगमनेर मार्गे रेल्वेचा मुद्दा त्यांनी प्रभावीपणे मांडला. याचबरोबर युवकांसाठी स्वतंत्र युवक कल्याण मंत्रालयाची मागणी केली. महिला व अनुसूचित जाती जमातीच्या आयोगाप्रमाणे राज्यातील तरुणांच्या प्रश्नांसाठी स्वतंत्र युवक आयोग असावा ही मागणी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली. याचबरोबर सरकारने ७५ हजार लवकर भरतीची घोषणा करून ती प्रत्यक्षात पूर्ण झाली नाही त्यामुळे तातडीने ही भरती करावी अशी मागणी त्यांनी केली. पोलीस दलातील मनुष्यबळ, महिलांच्या सुरक्षेसाठी विविध ठिकाणी सीसीटीव्ही देखभाल,मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून सर्वसामान्य नागरिकांची होणारी फसवणूक, याचबरोबर संगमनेर आणि पारनेर तालुक्यात नवीन एमआयडीसी सुरू करण्याची मागणी त्यांनी केली. महाराष्ट्रातील उद्योगांसाठी वीजदर देशात सर्वाधिक असल्याने गुजरात सारख्या इतर राज्यात हे उद्योग स्थलांतरित होत असल्याची चिंता व्यक्त करताना वीजदर समान ठेवावे अशी मागणी केली. तर उत्तर महाराष्ट्रात विदर्भ प्रमाणे उत्तर महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासासाठी डवांटेज उत्तर महाराष्ट्र ही परिषद आयोजित करण्याची सूचना त्यांनी केली.

संगमनेर शहरामध्ये स्वतंत्र महिला रुग्णालयाची मंजुरी लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या कार्यकाळात झाली आहे. ती कार्यवाही तातडीने पूर्ण करावी अशी मागण्या करण्याबरोबर सिन्नर तालुक्यातील वावी येथे ट्रॉमा तातडीने सुरू करावे. याचबरोबर नवी मुंबई विमानतळावरील प्रवाशांच्या सुविधा, सायबर गुन्हे,वकील संरक्षण कायदा, कारागृह सुरक्षा कायदा, रोजगार निर्मिती कार्यक्रमात शेळी मेंढी पालन व्यवसायाचा समावेश अनाधिकृत प्री प्रायमरी शाळांवर कारवाईची मागणी यांसह उत्तर महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्यास समवेत विविध शासकीय कर्मचाऱ्यांचे प्रश्नही त्यांनी मांडले. अत्यंत महत्त्वपूर्ण विषयाबरोबर अभ्यासपूर्ण विश्लेषणातून सभागृहाची लक्ष त्यांनी वेधून घेताना प्रश्नांचा पाठपुरावा करण्यासाठीच्या सूचनाही अत्यंत महत्त्वपूर्ण ठरल्या. आमदार सत्यजित तांबे यांनी विधान परिषदेत मांडलेल्या विविध प्रश्नांच्या वेळी व चर्चेवेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह मंत्री व सदस्य उपस्थित असत. या प्रश्नांबाबत व केलेल्या विविध प्रश्नांच्या पाठपुराव्याबाबत राज्यातील सर्वसामान्य नागरिकांमधून त्यांच्या चांगल्या कामाचे कौतुक होत आहे.

# गांधीनगरच्या जिल्हाध्यक्षपदी सिन्नरचे रविंद्र खताळे



**युवावार्ता (दत्तात्रय गोसावी)**

**सिन्नर-** सिन्नर तालुक्यातील पाटोळे येथील जिल्हा परिषद शाळेचे माजी विद्यार्थी रवींद्र खताळे यांची गुजरातच्या गांधीनगर येथे जिल्हाधिकारी पदावर नियुक्ती झाली आहे. त्यांच्या या यशस्वी वाटचालीमुळे पाटोळे गावात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पाटोळेचे सुपूत्र रवींद्र खताळे २०१६ बॅचचे आयएएस अधिकारी असून त्यांच्या सेवेची सुरुवात सुरेंद्रनगर नगरपालिकेचे मुख्याधिकारी म्हणून केली होती. त्यानंतर धरमपूर येथे उपविभागीय अधिकारी, गुजरात राज्य प्रशासनात कृषी व सहकार विभागाचे उपसचिव, कोरोना कालावधीत सुरत येथे विशेष अधिकारी, गीर सोमनाथ येथे जिल्हा विकास अधिकारी, अहमदाबाद येथे विभागीय आयुक्त, मेहसाणा महानगरपालिका आयुक्त आदी ठिकाणी समर्थपणे जबाबदारी सांभाळल्यानंतर मेहसाणा महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून त्यांनी उत्कृष्ट कामगिरीची नोंद केली.

या ठिकाणी केलेल्या प्रभावी व लोकाभिमुख कामाची दखल घेत त्यांना गुजरातची राजधानी गांधीनगर येथे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाचे नियोजन, कायदा व सुव्यवस्था, शहरी व ग्रामीण प्रशासनाचा व्यापक अनुभव असल्यामुळे ते सक्षम व दूरदृष्टी असलेले अधिकारी म्हणून ओळखले जातात. रवींद्र खताळे यांचे प्राथमिक शिक्षण पाटोळे येथील मराठी माध्यमाच्या जिल्हा परिषद शाळेत झाले. त्यानंतर मनेगाव येथे माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. पुढे त्यांनी नाशिक येथील केटीएचएम महाविद्यालयातून उच्च शिक्षण घेतले, तर अभियांत्रिकी शिक्षण पुणे येथील व्हीआयटी महाविद्यालयात पूर्ण केले.

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग – प्रसुति
• मुळव्याध–भगंदर–फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line : 7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# संगमनेर नगरपालिकेच्या जन आरोग्य समिती सदस्यपदी विशाल ढोले यांची नियुक्ती



**युवावार्ता (प्रतिनिधी)**

संगमनेर - राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत 'आयुष्मान आरोग्य मंदिर' (शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र), संगमनेर नगरपालिकेच्या 'जन आरोग्य समिती' च्या सदस्यपदी युवा कार्यकर्ते विशाल ढोले यांची निवड करण्यात आली आहे. या नियुक्तीबाबतचे अधिकृत पत्र शहरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. धिरज कणसे यांनी नुकतेच त्यांना प्रदान केले आहे. या निवडीबद्दल नाशिक पदवीधर मतदारसंघाचे माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी ढोले यांचा विशेष सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, माजी नगराध्यक्षा सौ. दुर्गाताई तांबे, नगराध्यक्षा डॉ. मैथीलीताई तांबे व कॅन्सर तज्ञ डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर नगरपालिकेच्या वतीने जन आरोग्य समितीची स्थापना करण्यात आली. याप्रसंगी बोलताना डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, विशाल ढोले यांनी सामाजिक क्षेत्रात नेहमीच तत्परतेने काम केले आहे. आता नगरपालिकेच्या जन आरोग्य समितीच्या माध्यमातून त्यांना शहराच्या आरोग्य सुविधा अधिक बळकट करण्याची आणि सर्वसामान्यांच्या आरोग्याच्या समस्या सोडवण्याची मोठी संधी मिळाली आहे. त्यांच्या कार्यक्षमतेवर विश्वास ठेवून ही जबाबदारी सोपवण्यात आली असून, ते निश्चितच शहराच्या आरोग्य व्यवस्थेत भरीव योगदान देतील.

आपल्या सत्काराला उत्तर देताना विशाल ढोले यांनी डॉ. सुधीर तांबे यांचे आभार मानले. ज्येष्ठांचे मार्गदर्शन आणि मित्रपरिवाराची साथ यामुळेच मी आज या पदापर्यंत पोहोचू शकलो आहे. जन आरोग्य समितीच्या माध्यमातून शहरातील आरोग्य सुविधा प्रत्येक गरजू नागरिकापर्यंत पोहोचवण्यासाठी आणि आरोग्याशी संबंधित प्रश्न सोडवण्यासाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्नशील राहीन अशी ग्वाही ढोले यांनी दिली. या सत्कार समारंभास किशोर ढोले, विकास वाव्हळ, गजानन पडवळ, कैलास तिदार, चंद्रकांत मव्हारे, प्रशांत भंडारे,अक्षय ढोले, प्रमोद गुलाब ढोले, राजीवकुमार साळवे सर, शरद भुजबळ, दिलीप पडवळ, शशांक खोजे सर, विलास नढे, दत्ता पारखे व मित्र परिवार उपस्थित होते. ढोले यांचे निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

पान १ वरून -

## संगमनेर...

या संकरातून जन्माला येणारी पिल्ले ही अतिशय आक्रमक आणि हिंस्र बनत आहेत. ही पिल्ले मोठी झाल्यानंतर त्यांच्यात नैसर्गिक शिकारी वृत्ती दिसून येत असून, ती मानवी वस्तीत आल्यावर थेट अंगावर धावून जाणे किंवा गंभीररीत्या चावा घेण्याचे प्रकार वाढले आहेत. शहरातील उपनगरांमध्ये रात्रीच्या वेळी पादचारी आणि दुचाकीस्वारांवर या हिंस्र कुत्र्यांकडून हल्ले होण्याचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः लहान मुले आणि वृद्ध या कुत्र्यांच्या निशाण्यावर आहेत. ही कुत्री केवळ भुंकत नाहीत, तर थेट शिकारीच्या थाटात हल्ला करत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत.

केवळ कुत्रे इकडून तिकडे हलवून हा प्रश्न सुटणारा नाही, हे आता स्पष्ट झाले आहे. भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करणे, त्यांच्यासाठी स्वतंत्र निवारा केंद्र उभारणे आणि वन्यप्राण्यांशी होणारा संपर्क टाळण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. जर प्रशासनाने वेळीच लक्ष दिले नाही, तर हा प्रश्न भविष्यात अधिक हिंस्र रूप धारण करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# खाकीचा धाक संपला ? जिल्ह्यात एका महिन्यात पोलिसांवर सहा जीवघेणे हल्ले

**युवावार्ता (प्रतिनिधी)**



अहिल्यानगर - सदरक्षणाय खलनिग्रहणाय या ब्रीदवाक्याला अक्षरशः हरताळ फासला जात असल्याचे चित्र जिल्ह्यात पाहायला मिळत आहे. गेल्या अवघ्या एका महिन्यात शेवगाव, पाथर्डी, श्रीरामपूर, राहुरी, राहाता आणि नगर परिसरात पोलिसांवर तब्बल सहा जीवघेणे हल्ले झाल्याने कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

गुन्हेगारांना पकडण्यासाठी किंवा दोन गटांतील वाद मिटवण्यासाठी घटनास्थळी धाव घेतलेल्या पोलिसांवर दगडफेक, लोखंडी गज तसेच धारदार शस्त्रांनी हल्ले करण्यात येत असल्याच्या घटना वाढत आहेत. विशेष म्हणजे या हल्ल्यांमध्ये केवळ सराईत गुन्हेगारच नव्हे, तर काही ठिकाणी सामान्य नागरिकांचाही सहभाग आढळून येत असल्याने परिस्थिती अधिक चिंताजनक बनली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकावरही जमावाकडून हल्ले झाल्याच्या घटनांनी पोलिस यंत्रणेची प्रतिमा धोक्यात आली आहे. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेलाच लक्ष्य केले जात असल्याने गुन्हेगारांचे मनोबल वाढत असून, सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत आहे.

दरम्यान पोलिस दलातील अंतर्गत मतभेद, वाढते भ्रष्टाचाराचे आरोप आणि काही ठिकाणी होत असलेला राजकीय हस्तक्षेपामुळे खाकी वर्दीचा दरारा कमी झाल्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे. यामुळे पोलिसांच्या कारवाईची धार बोथट होत असल्याचेही जाणकारांचे मत आहे.

**जिल्ह्यात वाढत चाललेल्या या घटनांनी एक स्पष्ट इशारा दिला आहे–जर वेळीच ठोस उपाययोजना केल्या नाहीत, तर कायदा–सुव्यवस्थेची परिस्थिती आणखी बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही. खाकीचा धाक पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी प्रशासनाने तातडीने निर्णायक पावले उचलणे अत्यंत गरजेचे ठरत आहे.**

**कडक कारवाईची गरज -**

पोलिसांवर हल्ला हा केवळ व्यक्तीवरचा हल्ला नसून तो कायद्याच्या राज्यावरच केलेला प्रहार आहे. त्यामुळे अशा घटनांकडे गांभीर्याने पाहून आरोपींवर कठोर कारवाई करणे अत्यावश्यक आहे. तसेच पोलिसांना आवश्यक संरक्षण, मनोबलवाढ आणि राजकीय दबावापासून मुक्त वातावरण देणे ही काळाची गरज बनली आहे.

# 'गुंजाळ'च्या चेअरमनसह तिघांचे जामीन अर्ज फेटाळले

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - कै. विमल गुंजाळ ग्रा. बि. सह. पतसंस्थेच्या संचालक आणि कर्मचाऱ्यांवर दाखल असलेल्या गुन्ह्यात जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. बी. गव्हाणे यांनी या प्रकरणातील एकूण १४ आरोपींपैकी ११ जणांना अटकपूर्व जामीन मंजूर केला असून, संस्थापक मधुकर वाळे यांच्यासह तिघांचा अर्ज मात्र फेटाळून लावला आहे.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, पतसंस्थेच्या अध्यक्षांनी आणि व्यवस्थापनाने त्यांना कर्ज देण्यासाठी शेतजमिनीचे गहाणखत करण्याऐवजी फसवणुकीने खरेदीखत लिहून घेतले. तसेच काही कोऱ्या कागदपत्रांवर सह्या घेऊन त्याचा गैरवापर करत सहकार कायद्याच्या कलम १०१ अन्वये वसुलीची कारवाई केली व जामीनदाराची मालमत्ता जप्त केली. संबंधित प्रकरणात कर्ज वसुलीच्या वादातून फसवणूक, बनावट कागदपत्रे आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (ॲट्रॉसिटी) संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर अटकेच्या भीतीने आरोपींनी न्यायालयात जामिनासाठी धाव घेतली होती.

सुनावणी दरम्यान आरोपींच्यावतीने ॲड. श्रेयस देशमुख आणि ॲड. स्वप्नील उपरे यांनी युक्तिवाद केला. त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, संबंधित संचालक व कर्मचाऱ्यांनी केलेली कारवाई ही केवळ अधिकृत कर्ज वसुली प्रक्रियेचा भाग होती. फिर्यादीने कर्ज थकवल्यामुळेच कायदेशीर प्रक्रिया राबवण्यात आली असून, अनेक संचालक तर संबंधित व्यवहाराच्यावेळी पदावरही नव्हते. या प्रकरणातील सर्वात कळीचा मुद्दा ॲट्रॉसिटी कायद्याचा होता. यावर न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, उपलब्ध कागदपत्रांमध्ये फिर्यादीच्या जातीवरून त्याला लक्ष्य केल्याचे किंवा जातीचा उल्लेख करून अपमानित केल्याचे कोणतेही सकृतदर्शनी पुरावे आढळत नाहीत. साधारणपणे ॲट्रॉसिटी कायद्यातील कलम १८-अ मुळे अटकपूर्व जामीन मिळणे कठीण असते, मात्र ॲड. श्रेयस देशमुख यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निकालांचे दाखले देत असा युक्तिवाद केला की, जर प्राथमिकदृष्ट्या गुन्हा सिद्ध होत नसेल तर जामीन देण्यास कायद्याची कोणतीही मनाई नाही. न्यायालयाने हा कायदेशीर युक्तिवाद ग्राह्य धरला आणि ११ आरोपींची भूमिका ही केवळ प्रशासकीय स्वरूपाची असल्याने त्यांना पोलीस कोठडीची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले. न्यायालयाने पोपट एरंडे, सीताराम फटांगरे, शांताराम जाधव, राधाबाई रहाणे, मीराबाई हासे, मारुती वाळे, मच्छिंद्र घुले, गोविंद घुले, रावसाहेब टेकुडे, संजय घुले आणि किरण घुले या ११ जणांना प्रत्येकी २५ हजार रुपयांच्या वैयक्तिक हमीवर जामीन मंजूर केला. तपासात सहकार्य करणे आणि साक्षीदारांवर दबाव न आणण्याच्या अटी घालण्यात आल्या आहेत.

# बालकांसाठी 'बोलक्या बाहुल्या' उपक्रम ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू

## डिसेंबरमध्ये राज्यस्तरीय साहित्य संमेलन होणार



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, शाखा संगमनेरतर्फे आयोजित केलेल्या बोलक्या बाहुल्या या पपेट शो कार्यक्रमास पालक व बालकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. पपेट शो कलाकार संगीता पुंडगे यांनी 'बोलक्या बाहुल्या' कार्यक्रमातून नागपंचमी, होळी, अफजलखान वधाचा प्रसंग, लावणी नृत्य, हिंदी गीत नृत्य, बोलकी बाहुली, देशभक्तीपर गीते व प्रबोधन गीतांची जोड देऊन प्रेक्षक मंत्रमुग्ध केले.

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था शाखा संगमनेर तर्फे सह्याद्री कॉलेज येथील के. बी. दादा देशमुख सभागृह येथे बोलक्या बाहुल्यांचा कार्यक्रम झाला. याप्रसंगी मंचावर माजी नगराध्यक्ष, संगमनेर नगरपरिषद, संगमनेरच्या दुर्गाताई तांबे, अनिल देशपांडे, डॉ. विवेक वाकचौरे, अरविंद गाडेकर, प्रा. अरुणलेले, दर्शन जोशी, शशांक गंधे, प्रकाश पारखे, प्रा. आसावरी रत्नपारखी, सुप्रिया गवांदे, नंदाताई मेंद्रे, अनघा खेडकर, प्रा. जितेंद्र पाटील,ज्येष्ठ नागरिक महासंघाचे कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर गोंटे, राजेंद्र खोसे आदी मान्यवर उपस्थित होते.

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचा बोलक्या बाहुल्या उपक्रम स्तुत्य असून यातून ज्ञान, रंजन आणि प्रबोधन मिळते आणि व्यक्तिमत्व विकास होतो असे प्रतिपादन प्रमुख अतिथी दुर्गाताई तांबे यांनी काढले.

पुढे त्या म्हणाल्या, अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेतर्फे कथाकथन कार्यशाळा आयोजित करण्यांत येणार आहे त्यात नागरिकांनी सहभाग घ्यावा. त्यात कथा कशी सांगावी, कथा कोणती निवडावी, लहान मुलांचे आणि मोठ्यांचे मानसशास्त्र ओळखून कथा कशी सादर करावी याचे मार्गदर्शन कथाकथन कार्यशाळेत होणार आहे. अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांच्या मार्गदर्शनात नेहमीच संगमनेरातील बालकांसाठी व मोठ्यांसाठी विविध दर्जेदार उपक्रम होत असतात.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष अनिल देशपांडे म्हणाले, डिसेंबर महिन्यात राज्यस्तरीय साहित्य संमेलन होणार आहे त्यात संगमनेरकर नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. ते म्हणाले अ. भा. म. बा. साहित्य संस्था शाखा संगमनेरची नविन सदस्य नोंदणी सुरू आहे ज्यांना सदस्य व्हायचे आहे त्यांनी आपली नोंदणी मोबाईल नंबर ८९८३७७१२५७ यावर करावी.

याप्रसंगी कथाकथनकार शांताराम डोंगरे, सौरभ म्हाळस, डॅनियल खरात, पपेट शो कलाकार संगीता पुंडगे, आणि शाळा मुख्याध्यापक, काशेश्वर विद्यालय, कासारवाडी, जि. प. प्रा. शाळा पोखरी हवेली, न. सो. कळसकर शाळा यांचा स्मृतिचिन्ह व सन्मान पत्र सन्मान देऊन सत्कार करण्यात आला करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुविधा आरसिद्ध यांनी केले. आभार दर्शन जोशी यांनी मानले.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला रसिक श्रोते तसेच पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अहिंसा परमो धर्म

## भगवान महावीर यांच्या जयंत्ती निमित्ताने

३१ मार्च भगवान महावीर यांची जयंती आहे. हा दिवस अतिशय पवित्र आहे. मानवी जीवन मौल्यवान आहे, हा संदेश महावीरांनी दिला. आपल्या आचार विचार, आणि उच्चारातून त्यांनी समाज बळकट केला. समाजात शांतता निर्माण केली. भगवान महावीर हे जैन धर्माचे २४ वे तीर्थकर. आपल्या विचारांनी त्यांनी समाजात खूप मोठी क्रांती केली आणि आपल्या आचाराने विश्वामध्ये क्रांती केली. बारा वर्षे तपश्चर्या करून एक प्रबळ इच्छाशक्ती निर्माण केली. मनाची पवित्रता, कठोर श्रम आणि शरीराला श्रमाची सवय आणि बुद्धिमत्तेला धार चढवणे याला आकार दिला. आपल्या कामातून त्यांनी समाजावर प्रभाव निर्माण केला. आपल्या वक्तव्यामधून सामर्थ्य निर्माण केले आणि आपल्या भ्रमणा मधून, संभाषणातून क्रांती केली. भगवान महावीरांनी अहिंसा, सत्य, ब्रह्मचर्य तप आणि अस्तेय ही पाच तत्वे सांगितली. ही तत्वे माणसाने प्रत्यक्ष जीवनामध्ये आणली पाहिजेत. म्हणजे माणसाचा विकास होईल. भगवान महावीर म्हणजे अहिंसा, त्याग, आत्मसंयम यांचे मूर्तीमंत प्रतीक होय. बारा वर्षे तपश्चर्या करून त्यांनी इंद्रियांवर विजय मिळवला आणि जगाला अहिंसा परमो धर्म:! हा संदेश दिला. बारा वर्षे तपानंतर त्यांना केवल ज्ञान प्राप्त झाले. त्यांची मुख्य शिकवण म्हणजे हिंसा करू नये, समता म्हणजेच सर्व जीव समान आहेत आणि अनेकांत वाद म्हणजे सत्याचे अनेक पैलू असू शकतात. त्यांनी दया, अहिंसा मनाची शुद्धता, आत्म शिस्त आंतरिक शांतीवर विश्वास ठेवला पाहिजे हे सांगितले. भगवान महावीरांच्या तत्त्वज्ञानात त्रिरत्ने खूप महत्त्वाची आहेत. सम्यक दर्शन याचा अर्थ योग्य श्रद्धा. सम्यक ज्ञान म्हणजे योग्य ज्ञान असणे आणि सम्यक चारित्र्य, योग्य चारित्र्य किंवा शुद्ध चरित्र असावे. भगवान महावीरांनी ९ सत्ये



सांगितली. ही नऊ सत्ये माणसाच्या जीवनाशी संबंधित आहे. जीव अजीव, पुण्य, पाप, आस्रव, बंध, संवर, निर्जरा, आणि मोक्ष. यांचा संबंध कर्म सिद्धांताच्या तत्त्वाशी आहे. जो मुक्तीच्या मार्गाचा आधार प्रदान करतो. महा म्हणजे महान आणि वीर म्हणजे नायक या अर्थाने ते महावीर बनले. माणसाचे जीवन मौल्यवान आहे .कर्माच्या बंधनातून मुक्त होऊन आत्म्याचा विकास करण्याकरता कठीण तपश्चर्या करायला पाहिजे, उपवास करायला पाहिजे आणि संयमी जीवन जगले पाहिजे असा संदेश त्यांनी दिला. खरं तर माणूस कसाही जगतो. अनेक वेळा आपल्याला समाजामध्ये माणूस हा पशु सारखा वागतो हे चित्र दिसते. वास्तविक मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. परंतु अनेक वेळा तो पशुसारखा वागतो आणि समाजामध्ये अशांतता निर्माण करतो. म्हणूनच भगवान महावीरांसारखे या पृथ्वीवर जन्म घेतात आणि माणसातला माणूस आणि त्याच्यातील भाव जागृत करतात. समाजात शांतता निर्माण करतात. आजच्या धकाधकीच्या काळात जीवनामध्ये शांततेचे क्षण आणि मन:शांती मिळवणं अतिशय कठीण झालेले आहे. ताण तणाव वाढलेले आहेत. त्यासाठीच भगवान महावीरांचे विचार आणि तत्त्वज्ञान आजच्या काळात अत्यंत आवश्यक आहेत. मानवामध्ये जो सतत तणाव निर्माण होतो, नकारात्मक भावना निर्माण होतात हे घालवण्यासाठी आत्मनिरीक्षण ,आत्मपरीक्षण आणि आत्मजागरुकता निर्माण झाली पाहिजे, त्यासाठीच भगवान महावीरांच्या विचारांची गरज आहे. खऱ्या अर्थाने आंतरिक समाधान , आंतरिक आनंद हा कोणत्याही बाह्य किंवा भौतिक वस्तूंवर अवलंबून नसतो. प्रत्येकाच्या अंतर्मनातून जाणारा एक निश्चित असा सुखद, आनंदाचा मार्ग असतो. हा आनंदाचा मार्ग एकदा कळला की आपले सर्व आयुष्य आनंद बनून जाते आणि मग या आनंदाचा एक उत्सव बनतो. एक सोहळा बनतो. हाच आनंदाचा मार्ग जीवन जगण्याचा मार्ग आपल्याला भगवान महावीरांनी दिला.

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**

# सर्व शाळांना २ मे ते १५ जून पर्यंत सुट्टी

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील सर्व राज्य मंडळाच्या शाळांमध्ये २ मेपासून विद्यार्थ्यांना अधिकृतपणे उन्हाळी सुट्टी लागू होईल. इतर मंडळांच्या काही शाळांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार किंवा शैक्षणिक उपक्रमांमुळे शाळा सुरू असल्यास, संबंधित शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या च्या हिताचा हिताच् विचार करून सुट्टी जाहीर करण्याबाबत निर्णय घ्यावा, असे शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे तसेच प्राथमिक शिक्षण संचालनालयाने परिपत्रकाद्वारे जाहीर केले.

यंदा शिक्षण विभागाने हा अपवाद रद्द करत राज्यभर एकसमान वेळापत्रक लागू केले आहे. विदर्भासह सर्व विभागांतील शाळा १५ जूनपासूनच सुरू करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. सर्व विभागांतील शाळांनी याच तारखेपासून नियमित अध्यापनास प्रारंभ करावा, असे आदेश देण्यात आले आहेत.

जूनमधील वाढत्या तापमानाचा विचार करून, शाळा सुरू झाल्यानंतर सुरुवातीच्या काही दिवसांत केवळ विदर्भातील शाळा सकाळी ७ ते ११.४५ या वेळेतच भरवण्यात याव्यात, असेही आदेश देण्यात आले आहेत. हा बदल १५ जून ते २७ जून या कालावधीत लागू राहील. त्यानेतर ३० जूनपासून या शाळा नियमित वेळेनुसार सुरू करण्यात येणार आहेत.

# ट्रॅक्टर मागे आल्याने दुचाकीवरील दोघे ठार


**युवावार्ता (प्रतिनिधी) अकोले –** तालुक्यातील औरंगपूर फाटानजीक पेट्रोल पंपासमोर ट्रॅक्टर ट्रॉलीला पाठीमागून मोटारसायकल धडकली. शनिवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास झालेल्या या अपघातात मोटारसायकलस्वार व त्यांच्यामागे बसलेल्या एकाच घरातील दीर-भावजय यांचा जागीच मृत्यू -झाला.

राजेंद्र दगडू गोडसे (वय ६३) व इंदुमती गंगाधर गोडसे (वय ६०), असे या अपघातात मृत्यू झालेल्या दीर-भावजयांची नावे आहेत. ट्रॅक्टर ट्रॉलीला मागून मोटरसायकल धडकली. ट्रॅक्टर अचानक मागे घेतल्याने हा अपघात झाला. यात जबर जखमी झालेल्या तालुक्यातील लहित बुद्रुक येथील राजेंद्र दगडू गोडसे व इंदुमती गंगाधर गोडसे यांचा जागीच मृत्यू झाला. दिवंगत राजेंद्र गोडसे हे संदीप व ज्ञानेश्वर गोडसे यांचे वडील होत, तर दिवंगत इंदुमती या गंगाधर दगडू गोडसे यांच्या पत्नी व चंद्रकांत गंगाधर गोडसे यांच्या आई होत. दिवंगत राजेंद्र यांचा मुलगा भारतीय सैन्य दलात आहे. तो लहित येथे पोहोचल्यानंतर रविवारी मुळा नदी तीरावर दोघा मयतांवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## संपादकीय...

### जयंतीनिमित्त

# मानवतेचा मार्गदर्शक भगवान महावीरांचे विचार



जगभरात शांतता, सहअस्तित्व आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या महापुरुषांमध्ये जैन धर्माचे चोविसावे तीर्थंकर भगवान महावीर यांचे स्थान अत्यंत उंच आहे. अहिंसेचे मूर्तिमंत प्रतीक म्हणून ओळखले जाणारे भगवान महावीर यांची जयंती दरवर्षी मोठ्या श्रद्धा आणि भक्तिभावाने साजरी केली जाते. त्यांच्या विचारांचे महत्त्व केवळ धार्मिक मर्यादेत सीमित नसून सामाजिक, नैतिक आणि जागतिक पातळीवरही ते आज अत्यंत सुसंगत ठरतात. वाढत्या हिंसाचाराच्या, असहिष्णुतेच्या आणि स्वार्थी वृत्तीच्या काळात भगवान महावीरांचे तत्वज्ञान मानवजातीसाठी एक दीपस्तंभ ठरते. भगवान महावीर यांचा जन्म इ.स.पूर्व ५९९ मध्ये वैशाली राज्यातील कुंडलपूर येथे झाला. त्यांचे वडील सिद्धार्थ आणि आई त्रिशला हे लिच्छवी गणराज्याशी संबंधित होते. राजेशाही वातावरणात वाढलेले महावीर बालपणापासूनच अत्यंत संवेदनशील आणि करुणामय होते. त्यांनी शिक्षणासोबतच शस्त्रविद्येचे प्रशिक्षण घेतले, मात्र त्यांचे मन सांसारिक सुखांमध्ये रमले नाही. वयाच्या सुमारे ३०व्या वर्षी त्यांनी सर्व सांसारिक बंधने तोडून संन्यास स्वीकारला आणि आत्मशोधाच्या मार्गावर प्रवास सुरू केला. महावीरांनी जवळपास १२ वर्षे कठोर तपश्चर्या केली. या काळात त्यांनी मौन, उपवास, आणि आत्मसंयम यांचा अवलंब करून शरीर आणि मनावर पूर्ण नियंत्रण मिळवले. अखेर त्यांना 'कैवल्य ज्ञान' प्राप्त झाले आणि ते 'जिन' म्हणजेच 'विजेता' म्हणून ओळखले जाऊ लागले. ज्ञानप्राप्तीनंतर त्यांनी समाजाच्या कल्याणासाठी उपदेश देण्यास सुरुवात केली. त्यांनी लोकांपर्यंत सहज पोहोचण्यासाठी अर्धमागधी भाषेचा उपयोग केला, ज्यामुळे त्यांचे विचार सामान्य जनतेपर्यंत पोहोचले. भगवान महावीरांच्या शिकवणीचा गाभा म्हणजे अहिंसा. त्यांनी केवळ शारीरिक हिंसा नव्हे, तर मन, वाणी आणि कृतीतून होणारी कोणतीही हिंसा टाळण्याचा संदेश दिला. सर्व जीवांना जीवन प्रिय आहे हा त्यांचा मूलभूत विचार होता. त्यामुळेच त्यांनी कोणत्याही सजीवाला इजा पोहोचवू नये, असा ठाम उपदेश केला. त्यांच्या मते, हिंसा करणारा, हिंसा घडवून आणणारा आणि हिंसेचे समर्थन करणारा - तिघेही दोषी आहेत. हा विचार आजच्या काळात अधिक महत्त्वाचा ठरतो, कारण आधुनिक समाजात हिंसेचे विविध रूपे पाहायला मिळतात. महावीरांनी पंचमहाव्रतांचा उपदेश केला - अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह आणि ब्रह्मचर्य. या पाच तत्त्वांमध्ये मानवी जीवनाचे संपूर्ण नैतिक मार्गदर्शन सामावलेले आहे. त्यांनी भौतिक वस्तूंवरील आसक्ती कमी करण्यावर भर दिला, कारण अपरिग्रहाच्या माध्यमातूनच खऱ्या अर्थाने मनःशांती प्राप्त होऊ शकते. तसेच सत्य आणि प्रामाणिकपणाला त्यांनी जीवनाचा पाया मानला.महावीरांचे तत्वज्ञान केवळ वैयक्तिक उन्नतीसाठी नसून सामाजिक समतेवरही आधारित आहे. त्यांनी स्त्री-पुरुष समानता, सर्व जीवांप्रती करुणा आणि सामाजिक न्याय यांचा पुरस्कार केला. त्यांनी 'चतुर्विध संघ' स्थापन करून समाजात समता आणि सहकार्याची भावना रुजवली. त्यांचे विचार लोकशाही आणि मानवाधिकारांच्या आधुनिक संकल्पनांशी सुसंगत असल्याचे दिसून येते. इ.स.पूर्व ५२७ मध्ये बिहारमधील पावापुरी येथे वयाच्या ७२व्या वर्षी भगवान महावीरांनी निर्वाण प्राप्त केले. त्यांचा निर्वाण दिन दीपावली म्हणूनही साजरा केला जातो, ही बाब त्यांच्या कार्याची व्यापकता दर्शवते. त्यांच्या जन्म आणि निर्वाण दिनी घरोघरी दिवे लावले जातात, जे अज्ञानाच्या अंधारावर ज्ञानाच्या प्रकाशाचा विजय दर्शवतात. आजच्या युगात, जिथे तंत्रज्ञान प्रगती करत आहे, पण माणुसकी कुठेतरी हरवत चालली आहे, तिथे भगवान महावीरांचे विचार अधिकच आवश्यक ठरतात. पर्यावरणाचे रक्षण, प्राणीसंवर्धन, सामाजिक सलोखा आणि मानसिक शांतता या सर्व बाबींमध्ये त्यांच्या शिकवणी मार्गदर्शक ठरतात. महावीर जयंती ही केवळ धार्मिक उत्सव नसून आत्मपरीक्षणाची संधी आहे.जर प्रत्येकाने महावीरांच्या शिकवणीचा थोडाफार तरी अवलंब केला, तर समाज अधिक शांततापूर्ण, समताधिष्ठित आणि सुसंवादी होऊ शकतो.

# अविनाश सूर्यवंशी यांनी पटकावले 'एनआयएसएम' प्रमाणपत्र



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- आपल्या कष्टाची कमाई कुठे गुंतवावी, यापेक्षा ती 'कोणाच्या' सल्ल्याने गुंतवावी, हे आजच्या काळात जास्त महत्त्वाचे ठरत आहे. शेअर बाजार आणि गुंतवणुकीच्या जगात फसवणुकीचे प्रकार वाढत असताना, संगमनेरकरांसाठी एक अभिमानास्पद आणि दिलासादायक बातमी आहे. संगमनेरमधील 'अविप्रत प्रा. लि.' (अविप्रत) संस्थेचे संचालक श्री. अविनाश मधुकर सूर्यवंशी यांनी 'पोर्टफोलिओ मॅनेजमेंट सर्व्हिसेस' ही अत्यंत कठीण आणि महत्त्वाची राष्ट्रीय परीक्षा ७८.३% इतक्या उत्तम गुणांनी उत्तीर्ण केली आहे. ही परीक्षा उत्तीर्ण होणारे ते संगमनेरमधील पहिलेच मार्गदर्शक ठरले असून, २७ मार्च २०२६ रोजी झालेल्या या परीक्षेत त्यांनी आपल्या अफाट वित्तीय ज्ञानाची चुणूक दाखवून दिली आहे.

ही परीक्षा 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट' (एनआयएसएम) द्वारे घेतली जाते, जी थेट भारतीय भांडवल बाजार नियामक 'सेबी' (सेबी) च्या मार्गदर्शनाखाली कार्य करते. यामुळे या प्रमाणपत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. विशेष म्हणजे, श्री. अविनाश सूर्यवंशी यांना पोर्टफोलिओ मॅनेजमेंट आणि आर्थिक सल्लागार क्षेत्रातील १० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांच्या या दांडग्या अनुभवाला आता 'सेबी' संचलित परीक्षेच्या अधिकृत प्रमाणपत्राची जोड मिळाल्याने, त्यांच्या मार्गदर्शनाची विश्वासार्हता अधिकच वाढली आहे. ज्या व्यक्तीकडे हे प्रमाणपत्र असते, तीच व्यक्ती तुमच्या गुंतवणुकीचे योग्य व्यवस्थापन करण्यास तांत्रिकदृष्ट्या सक्षम मानली जाते.

या यशाची काही विशेष वैशिष्ट्ये म्हणजे, श्री. सूर्यवंशी आता गुंतवणुकीचे जोखीम व्यवस्थापन (रिस्क मॅनेजमेंट) आणि नफा वाढवण्याचे शास्त्रशुद्ध तंत्र वापरून ग्राहकांना मार्गदर्शन करण्यास अधिकृतपणे पात्र ठरले आहेत. त्यांनी एकूण १०० गुणांपैकी ७८.३ गुण मिळवून आपली विशेष तजता सिद्ध केली आहे. संगमनेरमध्ये 'एनआयएसएम-सीरिज-२१-अ: पीएमएस' परीक्षा उत्तीर्ण होणारे ते पहिले तज्ज्ञ ठरले असून, 'सेबी'च्या कडक नियमांनुसार गुंतवणुकीचा अचूक सल्ला देणे आता स्थानिक पातळीवर शक्य झाले आहे. १० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आणि हे आधुनिक प्रमाणपत्र यामुळे आता संगमनेरमधील गुंतवणूकदारांना मोठ्या शहरांतील कंपन्यांकडे धाव घेण्याची गरज उरलेली नाही.

आजच्या अस्थिर बाजारपेठेत सामान्य माणसाला शेअर बाजार किंवा म्युच्युअल फंडमधील तांत्रिक बाबी समजत नाहीत. अशा वेळी एका अनुभवी आणि प्रमाणित मार्गदर्शकाची जोड असणे म्हणजे आपल्या संपत्तीला सुरक्षा कवच मिळवण्यासारखे आहे. तुमच्या आयुष्याची पुंजी कोणाकडे सोपवण्यापूर्वी, त्या व्यक्तीकडे 'सेबी' मान्यताप्राप्त प्रमाणपत्र आहे का, याची खात्री करणे ही काळाची गरज आहे, असे मत श्री. सूर्यवंशी यांनी व्यक्त केले. या घवघवीत यशामुळे 'अविप्रत' संस्थेवर आणि श्री. सूर्यवंशी यांच्यावर संगमनेरच्या व्यापारी आणि गुंतवणूकदार वर्गातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# आशेचे द्वार प्रतिष्ठान संस्थेकडून गरजू महिलांना साडी वाटप



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- संगमनेर तालुक्यातील निमगाव जाळी या गावामध्ये आशेचे द्वार प्रतिष्ठान पुणे या संस्थेद्वारे गरजू चाळीस महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले. ही संस्था महाराष्ट्रातील विविध भागात सामाजिक उपक्रम राबवत आहे. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत ही संस्था आपल्या सामाजिक कार्यामार्फत गरजूपर्यंत पोहोचत आहे. या संस्थेद्वारे मोफत शिलाई मशिन प्रशिक्षण, सर्वरोग निदान शिबिर, वृक्षारोपण, शालेय वस्तू वाटप, पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेल्या ठिकाणी बोअर व पाण्याची टाकी बांधून देणे, महिला सक्षमीकरण, व्यसनमुक्ती, करिअर गाईडन्स यांसारखे उपक्रम राबवत आहे.

याप्रसंगी जिल्हा पर्यवेक्षक विजय दारोळे यांनी संस्थेच्या कार्याविषयी माहिती दिली. या ठिकाणी सामाजिक कार्याबाबत स्वयंसेवक अमोल खरात, सुभाष मुंतोडे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे आयोजन ज्ञानेश्वर कदम यांनी केले.

कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष जोसेफ पवार, खजिनदार प्रशांत खावडिया, सचिव सचिन जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी संजय भोसले, निखिल भोसले, अनुजा भोसले, सविता गायकवाड, तारा दुशिंग, नंदा भोसले आदींसह मान्यवर उपस्थित होते.

# अश्वीतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेत दमदार कामगिरी




अश्वी (युवावार्ता प्रतिनिधी)- राष्ट्रीय आर्थिक दृष्ट्या मागास विद्यार्थ्यांसाठी शासनामार्फत दरवर्षी घेतली जाणारी राष्ट्रीय माध्यमिक शिष्यवृत्ती योजना परीक्षा सन २०२५-२६ साठी नुकतीच घोषित झाली आहे. या परीक्षेत अश्वी बुद्रुक (ता. संगमनेर) येथील रयत शिक्षण संस्थेच्या अश्वी इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाचा नावलौकिक वाढविला आहे. या विद्यालयातील तब्बल १२ विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले असल्याची माहिती प्राचार्य डी. के. वडीतके यांनी दिली.


यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये स्वरा दत्तात्रय गायकवाड, वैष्णवी बाबासाहेब चव्हाण, गायत्री बाळासाहेब घोडके, वैष्णवी जयराम उंबरकर, ईश्वरी जयराम उंबरकर, समर्थ सचिन घोडेकर, साई शशिकांत बोधक, राजराजेश्वरी गौतम गायकवाड, तन्वी योगेश गायकवाड, गीता म्हातारबा साबळे, धनश्री मल्हारी बिडगर, अश्विनी विजय तुपे व स्वामिनी महेश उंबरकर यांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्यामुळे हे यश मिळवले आहे. भविष्यातही अधिकाधिक विद्यार्थी या परीक्षेत यश संपादन करतील, असा आम्हाला विश्वास आहे, असे पर्यवेक्षक डी. पी. चव्हाण यांनी सांगितले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरुण कडू, चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, उत्तर विभाग चेअरमन आ. आशुतोष काळे, विभागीय अधिकारी एन. सी. बोडखे, उपविभागीय अधिकारी बाबासाहेब नाईकवाडी, प्रमोद तोरणे, सदस्य मनोज कवडे, तसेच स्थानिक शाळा समितीचे जेष्ठ सदस्य बाळकृष्ण होडगर, सुभाष म्हसे, सुमतीलाल गांधी, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष वैभव ताजणे व सर्व सदस्य, विद्यार्थी सुरक्षा समिती, सखी सावित्री समिती व महिला तक्रार निवारण समितीच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

या यशामागे प्राचार्य डी. के. वडीतके, पर्यवेक्षक डी. पी. चव्हाण तसेच शिक्षकवृंद योगेश रुपवते, प्रशांत वाळुंज, सुवर्णा वाकचौरे, बी. एम. सहाणे, भारती बागुल, मोहन घिगे, राजेंद्र बर्डे, हरिभाऊ कोकाटे, रमेश थेटे, महारुद्र तांबे, अनिता गाडे, शिल्पा आळेकर, रुपाली घुले, उषा घिगे, वैशाली आव्हाड, सखाहरी कचरे, गोरक्षनाथ आंबेकर, मनीषा वायळ, मीरा जंगले, अविनाश जोर्वेकर, ज्योती पाटील, किशोर उंबरकर, प्रज्ञा मुंतोडे आदींचे मार्गदर्शन लाभले.


**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

**पाहिजेत**
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

**पाहिजेत**
सेल्समन - १ जागा
सर्विस प्रोव्हायडर हेल्पर ०१ जागा
अकाउंटंट - ०१ जागा
कामाचे ठिकाण : संगमनेर
M/s. Pawar and Sons
7498621873

**बंगला भाड्याने पाहिजे**
2500 स्क्वेअर फूट बांधकाम व 4 व्हिलर गाडी पार्किंग सुविधा, बागेसाठी जागा असलेला नवीन नगर रोड, विद्यानगर, जाणता राजा मैदान, मालपाणी हॉस्पिटल परिसरात बंगला भाडे तत्त्वावर त्वरीत पाहिजे
- संपर्क -
9503626111
9272165050

**डेटा एंट्री ऑपरेटर पाहिजे**
पात्रता: संगणक ज्ञान व MS Excel / Google Sheets मध्ये काम करता येणे आवश्यक.
अनुभव असल्यास प्राधान्य.
वेळ: सकाळी 9 ते संध्याकाळी 6
पगार: चर्चेनुसार / अनुभवाप्रमाणे
पत्ता: मे. एन. के. गाडे ऑफिस, पहिला मजला, गाडे बिल्डिंग, आशिर्वाद पतसंस्थेजवळ, शिवाजीनगर, संगमनेर
9822684402

**पाहिजेत**
सेल्समन
(महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747

**त्वरित पाहिजेत**
द्वारकादास शामकुमार
सेल्समन, कॅशियर, स्टोअर मॅनेजर, फ्लोअर मॅनेजर, हेल्पर, सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ १० ते ७, १२ ते ९
9511238422

**हेल्पर पाहिजे**
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी ड्रायव्हर बरोबर कामासाठी हेल्पर पाहिजे
पत्ता– मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977

**पाहिजेत**
मार्केटिंगसाठी कॉम्प्यटर्सची माहिती असलेले मुले पाहिजेत
पोर्णिमा एजन्सी नगरपालिकेजवळ, सारिका ड्रेसेस समोर, संगमनेर
7588607008
9890636830

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

**नावात बदल**
माझे नाव लग्नाआधी शाळा सोडल्याच्या दाखल्यावर **पार्वती राजाराम मंडलिक** असे होते. लग्नानंतर सर्व कागदपत्रावर **प्रमिला रामनाथ अभंग** असे आहे. तरी या दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच आहे.
**प्रमिला रामनाथ अभंग**
रा. संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४
वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

CorelDRAW
WE ARE HIRING
JOIN OUR TEAM

GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005




MALPANI
卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित
**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

# उद्योजक गिरीशभाऊ मालपाणी

# दूरदृष्टी, नेतृत्व आणि समाजसेवेचा अद्वितीय प्रवास...



## वाढदिवसाचे विशेष औचित्य

३० मार्च हा दिवस संगमनेरच्या भूमीत जन्मलेल्या, उद्योगविश्वात आपले वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या आणि समाजसेवेतून जनमानसात अढळ स्थान मिळवणाऱ्या माननीय गिरीशभाऊ मालपाणी यांच्या वाढदिवसाचा विशेष दिवस आहे. एका सामान्य कुटुंबातून सुरू झालेला त्यांचा प्रवास आज उद्योग, शिक्षण, ऊर्जा, पर्यटन, सहकार आणि समाजसेवा अशा विविध क्षेत्रांत व्यापक यश मिळवणारा ठरला आहे. त्यांचे व्यक्तिमत्व हे केवळ एक यशस्वी उद्योजक म्हणून मर्यादित नसून, ते एक दूरदर्शी लीडर, सामाजिक बांधिलकी जपणारे कार्यकर्ते आणि नव्या पिढीसाठी प्रेरणास्थान आहेत.

**शिक्षण व प्रारंभिक घडण**

श्री. गिरीश मालपाणी हे महाराष्ट्रात एक यशस्वी उद्योजक म्हणून सुपरिचित आहेत. संगमनेरमध्ये त्यांचे बालपण व्यावसायिक संस्कारातच घडले. त्यांनी पुण्यामध्ये बी.ई. केमिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले आणि त्यानंतर अमेरिकेत जाऊन एमबीए ही पदवी संपादन केली. या शिक्षणामुळे त्यांना तांत्रिक ज्ञानाबरोबरच व्यवस्थापन कौशल्य, जागतिक दृष्टिकोन आणि व्यवसायातील आधुनिक तत्त्वांची सखोल जाण मिळाली. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी आपल्या पारंपरिक मालपाणी उद्योग समूहाची धुरा स्वीकारली आणि संचालक म्हणून काम पाहण्यास सुरुवात केली.

**पारंपरिक व्यवसाय ते आधुनिक विस्तार**

मालपाणी उद्योग समूहाची पायाभरणी त्यांच्या पूर्वजांनी केली होती. गाय छाप जर्दा हा ब्रँड हा या समूहाचा पाया असून आजही तो बाजारात विश्वासाचे प्रतीक मानला जातो. त्याचबरोबर अमृता चहा, माऊथ फ्रेशनर्स, बादशाह खैनी यांसारखी विविध उत्पादने ग्राहकांमध्ये लोकप्रिय झाली आहेत. गिरीशभाऊंनी पारंपरिक व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञान, उत्कृष्ट गुणवत्ता, आकर्षक पॅकेजिंग आणि मार्केटिंगची जोड देत व्यवसायाला नवे आयाम दिले.

मेहनत आणि ग्राउंड कनेक्ट

संगमनेरमधील टीम साऊथमध्ये नेऊन व्यवसायवृद्धीची कल्पना करणारे गिरीशभाऊ एकमेव उद्योजक असतील. प्रत्येक जिल्हा, तालुक्यातील छोट्याशा गावातील दुकानदारांशी आजही प्रत्यक्ष भेट देऊन संवाद साधणारे गिरीशभाऊ प्रचंड मेहनती आहेत. व्यावसायासाठी अनेक वेळा कंटाळवाणा असलेला प्रवास ते लीलया करतात आणि अगदी रात्री कितीही उशीरा आलेले गिरीशभाऊ दुसऱ्या दिवशी मीटिंगसाठी सकाळीच हजर असतात.

**FMCG, बांधकाम व रिअल इस्टेट क्षेत्रातील यश**

त्यांच्या नेतृत्वाखाली मालपाणी समूहाने केवळ FMCG क्षेत्रातच नव्हे तर रिअल इस्टेट आणि बांधकाम क्षेत्रातही मोठी झेप घेतली आहे. पुणे आणि नाशिकबरोबरच देशात नाविन्यपूर्ण, अत्याधुनिक आणि पर्यावरणपूरक बांधकाम प्रकल्प राबवून समूहाने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या उत्कृष्ट कार्याची दखल घेत महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते बांधकाम व्यवसायातील पुरस्काराने समूहाला सन्मानित करण्यात आले, ही त्यांच्या गुणवत्तेची आणि नाविन्याची पावतीच आहे.त्यांच्या कल्पनेतून सुरू झालेली सरगम सुपर शॉपी याची विविध शहरात असलेली साखळी हळू हळू मोठा आकार घेत आहे.

**पर्यटन व मनोरंजन क्षेत्रातील योगदान**

पर्यटन आणि मनोरंजन क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. शिर्डी आणि लोणावळा येथे उभारलेले वेट-एन-जॉय वॉटर पार्क आणि अम्युझमेंट पार्क आज पर्यटकांसाठी प्रथम पसंतीची ठिकाणे ठरली आहेत. विशेष म्हणजे, शिर्डी येथे उभारलेले साईतीर्थ स्पिरिच्युअल थीम पार्क हे भारतातील पहिले धार्मिक थीम पार्क असून, ते देश-विदेशातील पर्यटकांच्या आकर्षणाचे प्रमुख केंद्र बनले आहे. या प्रकल्पातून त्यांनी आध्यात्मिकता आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा सुंदर मिलाफ साधला आहे. लोणावळा इमॅजिका नंतर अहमदाबाद येथेही वॉटर पार्क ची मुहूर्तमेढ रोवली गेली आहे. नव्यानेच सुरू केलेल्या डेव्ह अँड बस्टर्सलाही नागरिकांची पोच पावती मिळत आहे.

**ऊर्जा क्षेत्रातील मोठी झेप**

ऊर्जा क्षेत्रातही गिरीशभाऊंनी दूरदृष्टी दाखवत अपारंपरिक उर्जा निर्मितीमध्ये मोठी गुंतवणूक केली. पवन ऊर्जा (Wind Mill) आणि सौर ऊर्जा (Solar Power) प्रकल्प विविध राज्यांत उभारून त्यांनी पर्यावरणपूरक विकासाला चालना दिली. देशातील पहिल्या बारा उद्योग समूहांमध्ये स्थान मिळवत आज समूहाने सुमारे १००० मेगावॅट ऊर्जा निर्मितीचा टप्पा गाठला आहे. ही केवळ उद्योगाची प्रगती नसून, देशाच्या ऊर्जा स्वावलंबनासाठी दिलेले मोठे योगदान आहे.

**हॉस्पिटॅलिटी आणि समर कॅम्प उपक्रम**

हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात मालपाणी क्लब ॲण्ड रिसॉर्ट आणि मालपाणी पॅलेस ही उत्कृष्ट उदाहरणे आहेत. विशेष म्हणजे, गेल्या १४ वर्षांपासून येथे विद्यार्थ्यांसाठी निवासी उन्हाळी शिबिर (Malpani Summer Camp) आयोजित केले जाते. गिरीशभाऊ आणि सुनिताभाभी स्वत: या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. महाराष्ट्रासह विविध राज्यांतील सुमारे ७०० विद्यार्थी या कॅम्पमध्ये सहभागी होतात. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, शिस्त, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्व विकासाचे गुण विकसित केले जातात.

**शिक्षण क्षेत्रातील योगदान**

शिक्षण क्षेत्रातही त्यांनी मोठे योगदान दिले आहे. मालपाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून संगमनेर आणि पुणे येथे ध्रुव ग्लोबल स्कूल चालवून आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून दिले जात आहे. संगमनेरमधील मातोश्री रू. दा. मालपाणी विद्यालय ही संस्था शिक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाज घडवण्याचे त्यांचे कार्य अत्यंत मोलाचे आहे. ब्ल्यू रिज पब्लिक स्कुल आणि अरीहंत एज्युकेशन फाउंडेशन च्या माध्यमातून शिक्षणाची मोठी संधी त्यांनी उपलब्ध करून दिली आहे. ध्रुव ग्लोबल स्कुलची दुबई येथे असलेली ब्रांच जागतिक शिक्षण व्यवस्थेत मालपाणी परिवाराने टाकलेल्या पाऊलाचे उत्तम उदाहरण आहे.

**सहकार क्षेत्रातील प्रभाव**

सहकार क्षेत्रातही गिरीशभाऊंचा प्रभाव मोठा आहे. शारदा नागरी सहकारी पतसंस्थेचे ते माजी अध्यक्ष असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची प्रगती सातत्याने होत आहे. १०० कोटींपेक्षा अधिक उलाढाल असलेल्या या संस्थेचे ते आधारस्तंभ मानले जातात. त्यांच्या नेतृत्वामुळे सहकार क्षेत्रातही पारदर्शकता, विश्वास आणि विकास साध्य झाला आहे.

**समाजसेवेची अखंड परंपरा**

समाजसेवा हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. मालपाणी उद्योग समूहाच्या वतीने केवळ १ रुपयात सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले जाते, ज्यामध्ये आजवर ११०० पेक्षा अधिक वधू-वरांचे विवाह संपन्न झाले आहेत. तसेच मालपाणी परिवार चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून ५० बेडचे अत्याधुनिक हॉस्पिटल उभारण्यात आले असून, येथे केवळ १० रुपयांत रुग्णांची तपासणी केली जाते आणि सवलतीच्या दरात औषधे दिली जातात. हे कार्य त्यांच्या समाजाभिमुख दृष्टिकोनाचे उत्तम उदाहरण आहे.

**लायन्स चळवळीतले नेतृत्व**

गिरीशभाऊ मालपाणी हे लायन्स चळवळीतील एक प्रभावी नेतृत्व म्हणून ओळखले जातात. २००५ मध्ये त्यांनी लायन्स इंटरनॅशनलमध्ये प्रवेश केला आणि अनेक सामाजिक उपक्रम यशस्वीपणे राबवले.

लायन्स क्लबच्या माध्यमातून वृक्षारोपण, स्वातंत्र्योत्सव, रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीरे, भव्य मॅरेथॉन स्पर्धा, उद्योजक आणि नागरिकांसाठी भव्य एक्स्पो, वंचित व्यक्तींना मदतीचा हात, शालेय विद्यार्थ्यांना स्कूल कीटचे वाटप आदी प्रकल्प ते सतत राबवीत असतात.२०१४-१५ मध्ये ते व्हाईस डिस्ट्रिक्ट गव्हर्नर झाले आणि २०१७-१८ मध्ये डिस्ट्रिक्ट ३२३४ डी-२ (पुणे, नगर, नाशिक) चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर म्हणून त्यांनी उत्कृष्ट कार्य केले. त्यांचा कार्यकाल लायन्स क्लबच्या विस्तारासाठी आणि सामाजिक उपक्रमांसाठी विशेष लक्षात राहिला. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना Ambassador of Goodwill हा आंतरराष्ट्रीय सन्मान प्राप्त झाला . तसेच ते लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायरचे संस्थापक अध्यक्ष असून लायन्स इंटरनॅशनलचे माजी मल्टिपल कौन्सिल चेअरमन म्हणून त्यांनी काम केले आहे. भारतातील लायन्स क्लबचे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे आदराने पाहिले जाते.

**सहचारिणीचे मोलाचे योगदान**

त्यांच्या या कार्यात त्यांना त्यांच्या पत्नी सौ. सुनिता मालपाणी यांची समर्थ साथ लाभली आहे. त्या डिस्ट्रीक्ट ऋ-ढ कोऑर्डिनेटर, GST चेअरमन, रिजन चेअरमन आणि क्लबच्या अध्यक्षा म्हणूनही कार्यरत राहिल्या आहेत. भविष्यातील डिस्ट्रीक्ट गव्हर्नर म्हणूनही त्यांच्याकडे बघितले जाते. या दाम्पत्याचा सामाजिक कार्यातील सहभाग हा समाजासाठी प्रेरणादायी आहे.

**मार्गदर्शन, व्याख्याने व व्यक्तिमत्व वैशिष्ट्ये**

गिरीशभाऊ अनेक सेवाभावी संस्थांचे आश्रयदाते आहेत. माहेश्वरी पंच ट्रस्ट संगमनेरचे ते अध्यक्ष आहेत. 5S, Kaizen, Branding आणि Marketing यांसारख्या विषयांवर त्यांनी अनेक ठिकाणी व्याख्याने दिली आहेत. एवढेच नाही तर युट्यूबच्या माध्यमातून अनेक लेक्चर सेरिजही ते चालवत आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा आणखी एक पैलू म्हणजे त्यांची शिस्तबद्ध जीवनशैली - ते वर्षानुवर्षे दररोज व्यायाम करण्याची सवय पाळत आहेत.

**कला व वैयक्तिक आवड**

संगीताची आवडही त्यांच्या व्यक्तिमत्वाला एक वेगळी ओळख देते. ते उत्तम प्रकारे माऊथ ऑर्गन आणि सिंथेसायझर वाजवतात, ज्यातून त्यांच्या सर्जनशीलतेची झलक दिसून येते.

**कुटुंब व पुढील पिढी**

गिरीशजी मालपाणी यांची कन्या दिव्या ही स्किनव्हेस्ट या ब्रँडची संचालक असून या ब्रँडचे प्रॉडक्ट देशभर विकले जातात. दुसरी मुलगी सोनिया ही अमेरिकेमध्ये उच्च शिक्षण घेत आहे.

गिरीशजी मालपाणी यांच्या कार्याची दखल घेत त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. हे पुरस्कार त्यांच्या कार्याची आणि योगदानाची साक्ष देतात.

**प्रेरणादायी जीवनप्रवास**

गिरीशभाऊ मालपाणी यांचे जीवन हे केवळ यशाची कहाणी नाही, तर ते एक प्रेरणादायी प्रवास आहे. त्यांनी व्यवसायाला समाजसेवेचे साधन बनवले आणि समाजाला परत देण्याची भावना कायम जपली. दूरदृष्टी, व्यवस्थापन कौशल्य, नाविन्य, शिस्त आणि सेवाभाव यांच्या जोरावर त्यांनी एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. आजच्या तरुण पिढीसाठी ते एक जिवंत प्रेरणास्थान आहेत.

**संस्कार आणि परंपरेची जोड**

मालपाणी उद्योग समूहाचे अध्वर्यू स्व. माधवलालजी मालपाणी यांच्या पावलावर पाऊल ठेवून व्यावसायिक यशस्वीततेची अनेक शिखरे गाठणारे गिरिषभाऊ मात्र आपल्या आई सुवर्णकाकी यांच्या संस्काराच्या जोरावर सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रातही आपले योगदान देत आहेत.

**मॅनेजमेंट क्षेत्रातील अवलिया गिरिषभाऊ मालपाणी यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा! त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत अनेकांनी उद्योग, समाजसेवा आणि नेतृत्वाच्या क्षेत्रात नवे यश मिळवावे, हीच सदिच्छा.**

## आज गिरीशजी मालपाणी यांचा वाढदिवस...!



माझा आणि गिरीशभाऊंचा परिचय जरी जुना असला, तरी व्यवसाय, समाजकारण आणि नेतृत्वाच्या विविध पैलूंमधून त्यांना जवळून समजून घेण्याची संधी मला लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायरच्या माध्यमातून मिळाली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील दूरदृष्टी, निर्णयक्षमता, अथक परिश्रम आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी ही प्रत्येक वेळी नव्याने प्रेरणा देणारी आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त मी जवळून अनुभवलेल्या उद्योजक, लीडर आणि समाजसेवक गिरीश मालपाणी यांच्या कार्याचा हा एक छोटासा आढावा

**— सुदीप हासे,**

**(कार्यकारी संपादक, दैनिक युवावार्ता, संगमनेर)**











## संगमनेरला अवकाळीचा तडाखा...(पान १ वरुन)

अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी जिल्हा नियंत्रण कक्ष (टोल फ्री १०७७) किंवा जवळच्या शासकीय कार्यालयाशी संपर्क साधावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, माजी कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर तालुक्यातील निमज परिसराला भेट देत नुकसानीची पाहणी केली. बाधित शेतकऱ्यांना धीर देत तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्तांना शासनाकडून त्वरित मदत देण्याची मागणी त्यांनी केली.

एकूणच, या अवकाळी पावसामुळे संगमनेर तालुक्यातील शेतकरी व नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

## श्री क्षेत्र रामेश्वर देवस्थान चणेगावमध्ये धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

**चणेगाव युवावार्ता प्रतिनिधी)–**

संगमनेर तालुक्यातील चणेगाव येथील श्री क्षेत्र रामेश्वर देवस्थानमध्ये श्री गुरदेवदत्त महाराज मर्ती, कासव मुर्ती प्राणप्रतिष्ठा व विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि. ३० मार्च २०२६ ते १२ एप्रिल पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहे. सोमवार ३० मार्च रोजी सकाळी कलाकर्षण (उत्यापण) विधी पार पडला. दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी श्री गुरूदेवदत्त महाराज व कासव मुर्ती मिरणवूक पार पडणार आहे. यावेळी सकाळी सखाराम ठमाजी राजनर यांच्यावतीने अन्नदान करण्यात येणार आहे. शनिवार ११ एप्रिल रोजी प्राणप्रतिष्ठा विधी होणार असून यावेळी रामेश्वर फक्कड पाटोळे यांचे अन्नधान आहे. रविवार दि. १२ एप्रिल रोजी बालब्रम्हचारी ह.भ.प. दत्तगिरी महाराज यांचे जाहीर हरीकिर्तन होणार आहे. यावेळी महाप्रसाद विजय भारत गडधे यांच्याकडून होणार आहे. या धार्मिक कार्यक्रमासाठी व मुर्ती प्राणप्रतिष्ठेसाठी नारायण ढमक, मेजर कोंडाजी लोहाळे, अण्णासाहेब पावडे, परमेश्वर पाटोळे यांच्यासह गावातील आजी-माजी सैनिक तरूण मंडळ, महिला यांच्यावतीने मोठे यागदान देण्यात येत आहे. या सोहळ्यासाठी भाविक भक्तानी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन चनेगाव ग्रामस्थांनी केले आहे.

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू - फ्री GST स्कीम
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत - संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन .................. 05
सेल्सगर्ल.................. 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर......................... 03
We are HIRING!
भंडारी
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# हीरक महोत्सवी वर्षात संगमनेर मर्चंट बँकेची गरुड झेप

## नाशिकमध्ये दहावी शाखा सुरू; बँकेच्या विस्ताराला गती



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या हीरक महोत्सवी वर्षात सर्वांच्या विश्वासामुळे बँकेने जोरदार घोडदौड सुरू ठेवली असून एकंदरीत एक हजार कोटींच्या व्यावसायिक उद्दिष्ट पूर्तीकडे गरुड झेप घेतली आहे. याचे श्रेय बँकेवर अतूट विश्वास असणारे हजारो सभासद ठेवीदार खातेदार कर्जदार हितचिंतक आणि आजी-माजी संचालक यांना कृतज्ञतेने समर्पित करीत आहोत असे भावपूर्ण उद्‌गार उद्योगपती आणि संगमनेर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन राजेश मालपाणी यांनी येथे काढले.

१९६६ साली दूरदृष्टी असलेले उद्योगपती स्वर्गीय ओंकारनाथजी मालपाणी यांनी आपल्या समविचारी व्यापारी मित्रांसह स्थापन केलेल्या बँकेचे २०२६ हे हीरक महोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्त बँकेच्या माजी संचालकांचा स्नेहमिलनाचा सोहळा मालपाणी क्लब एण्ड रिसॉर्ट येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी प्रास्ताविकामध्ये श्री.मालपाणी यांनी वरील उद्गार काढले.

अत्यंत स्पर्धात्मक वातावरण असताना देखील संगमनेर मर्चंट बँकेने भक्कम आर्थिक स्थितीमुळे ग्राहकांना स्पर्धात्मक सेवा दिली. अत्यंत पारदर्शक व्यवहार आणि नवनवीन कल्पक योजना यामुळे बँकेचा एकत्रित व्यवसाय ७७९ कोटींवरून १००० कोटींच्या उद्दिष्ट पूर्तीकडे झेपावला आहे. बँकेने यंदाच्या वर्षात विक्रमी समजली जाणारी ३०% व्यवसाय वृद्धी लीलया करून दाखवली आहे असे श्री.मालपाणी म्हणाले.

कार्यक्रमाची सुरूवात उपस्थित महिला संचालकांच्या शुभहस्ते गणेश मूर्तीचे पूजन करण्यात आले. हीरक महोत्सवी वर्षातील प्रगतीच्या टप्प्यांचा धावता आढावा घेताना श्री.मालपाणी यांनी विविध घटनांचा आवर्जून उल्लेख केला. सर्व आजी-माजी संचालकांच्या उपस्थितीत एकूण ५३३५ सभासदांना हीरक महोत्सवी वर्षानिमित्त रुपये १०६१ ची भेट खात्यात जमा करण्यात येत आहे ही घोषणा होताच उपस्थित सर्वांच्या मोबाईलवर भेट रक्कम खात्यात जमा झाल्याचे मेसेज आले. सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून व पर्यावरण रक्षणाच्या कामासाठी संचालक मंडळाच्या बैठकीत डिजिटल टॅबचा वापर सुरू केल्याने फोटोकॉपी चा खर्च आणि कागद वाचवण्याचे उद्दिष्ट साध्य झाले आहे व पेपरलेस बोर्ड मिटिंगची संकल्पना राबविणारी आपली पहिली नागरी सहकारी बँक आहे. प्रवेशद्वारा वर भव्य डएऊबोर्ड लावल्याने फ्लेक्समुक्त मोहिमेत बँकेचाही सहभाग झाला. मोबाईल बँकिंग आणि यूपीआय व्यवहारांचा नवा विक्रम बँकेने प्रस्थापित केला आहे. बँकेच्या स्टाफ साठी खास इंदोर-उज्जैन धमाल ट्रिपचे आयोजन करण्यात आले होते आणि विशेष बोनस प्रस्तावित आहे. हीरक महोत्सवाच्या वर्षातच गौरवशाली वाटचालीची परंपरा अखंड राखून बँकेची दहावी आणि जिल्ह्याच्या ठिकाणची पहिली शाखा नाशिक शहरात कार्यरत झाली हा क्षण विशेष अभिमानाचा होता' असे श्री.मालपाणी म्हणाले. हीरक महोत्सवी वर्षाचे प्रेरणा दिनाचे तिनही कार्यक्रम सभासदांना विशेष भावले व त्यास मोठा प्रतिसाद मिळाला. यानिमित्ताने हीरक पर्व स्मरणिकाही लवकरच प्रकाशित करण्यात येणार आहे

*यावेळी सर्वश्री ओंकारनाथ भंडारी, डॉ.अरविंद रसाळ, सुभाष जंगम, चंदनमल बाफना, जसपाल डंग, सीए नारायण कलंत्री, राजेंद्र सोमाणी, ओंकार उर्फ राजू बिहाणी, श्रीगोपाळ पडतानी, जगदीश अट्टल, डॉ.ओमप्रकाश सिकची यांनी आपले मनोगत व्यक्त केले. 'हीरक महोत्सवी वर्षात संस्थेने आठवण ठेवून आम्हाला आवर्जून स्नेहमिलनास निमंत्रित केले आणि आमच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली त्यामुळे आम्ही भारावून गेलो आहोत अशी भावना त्यांनी व्यक्त केली. संस्थापक चेअरमन स्व.ओंकारनाथजी मालपाणी यांच्या दूरदृष्टीने तसेच काटकसर व शिस्तिच्या लावून दिलेल्या परंपरेने बँक सातत्याने प्रगतीपथावर आहे. त्यांनी बँकेसाठी निवडलेली नवीन नगर रोडवरील जागा व वेळोवेळी आलेल्या अडचणींवर केलेल्या उपाय योजनांची या निमित्ताने उजळणी केली. स्नेहमिलन कार्यक्रमास संस्थेचे आजी व बहुतांश माजी चेअरमन, व्हाईस चेअरमन व संचालक आवर्जून उपस्थित होते.

बीओएम चेअरमन सीए संजय राठी यांनी बँकेच्या भक्कम आर्थिक परिस्थिती विषयी अभ्यासपूर्ण विवेचन केले. व्हा. चेअरमन मधुसूदन नावंदर यांनी मनोगत व आभार प्रदर्शन केले. सूत्रसंचालन प्रकाश राठी यांनी केले.

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

## भावपूर्ण श्रद्धांजली

### कै. माधव रामभाऊ हासे



राजापूर गावचे सुपुत्र व धडाडीचे नेतृत्व कै. माधव रामभाऊ हासे यांचे दिनांक २४/०३/२०२६ रोजी निधन झाले आहे.

त्यांच्या अचानक जाण्याने राजापूर गावावर व पंचक्रोशीत शोककळा पसरलेली आहे. कधीही न भरून येणारे नुकसान झाले आहे.

**दशक्रिया विधी**

त्यांचा दशक्रिया विधी गुरुवार दिनांक ०२/०४/२०२६ रोजी राजापूर या ठिकाणी होणार आहे.
दैनिक युवावार्ता त्यानिमित्त श्रद्धांजली अंक प्रकाशित करीत आहे. या अंकात श्रद्धांजली जाहिरात असावी अशी विनंती.

त्यांच्याविषयी शोक प्रतिक्रिया, जाहीरात मजकूर दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत पाठवावे.

संपर्क - सुहास सातपुते, उपसंपादक (मो. ८३८०९५६६०४)

# बारा हजारांचे डिझेल लंपास

## लॉक तोडून चोरट्याची मध्यरात्री धाडसी चोरी




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील घारगाव परिसरात पुन्हा एकदा डिझेल चोरीचा प्रकार समोर आला असून अज्ञात चोरट्याने मध्यरात्रीच्या सुमारास वाहनाच्या टाकीचे लॉक तोडून सुमारे बारा हजार रुपयांचे डिझेल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गालगत एकोणावीस मैल परिसरात उभ्या असलेल्या वाहनाला चोरट्याने लक्ष्य केले. रविवारी (दि. २९ मार्च) मध्यरात्री २ ते पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान ही चोरी घडली. चोरट्याने अत्यंत सफाईदार पद्धतीने टाकीचे लॉक तोडत सुमारे १२० लिटर डिझेल (अंदाजे ११,१६० रुपये किमतीचे) चोरून नेले.

या प्रकरणी वाहनचालक प्रवीण लेडे (वय ३२, रा. खंदरमाळ, ता. संगमनेर) यांनी घारगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कोकाटे पुढील तपास करत असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)

सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध

- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)

०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल
सेले नव्हे होलसेल सेल
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25